


# विद्यार्थ्यांचे रामदास

॥ श्रीराम समर्थ ॥

श्री समर्थ रामदास स्वामींचा जन्म - सन १६०८

श्री समर्थ रामदास स्वामींची तपश्चर्या
सन १६२० ते १६३२

श्री समर्थ रामदास स्वामींची तीर्थयात्रा
सन १६३२ ते १६४४

श्री समर्थ रामदास स्वामींचे समाज प्रबोधन
सन १६४४ ते १६७८

श्री समर्थांनी सन १६८२ साली
सज्जनगडावर समाधी घेतली.

श्री समर्थ रामदास
जन्मोत्सव चतुःशताब्दी सोहळा

# विद्यार्थ्यांचे रामदास

## ।। श्रीराम समर्थ ।।

सुमारे ३५० वर्षांपूर्वी
मरगळलेल्या महाराष्ट्राला
समर्थांच्या या वाणीने
संजीवनी दिली होती.

उद्याचा भारत घडवणाऱ्या
आजच्या विद्यार्थ्यांना
ती अजूनही तेवढीच
मार्गदर्शक ठरू शकते.

संपर्कासाठी पत्ता :वैष्णव ब, २१८४ सदाशिव पेठ,
पर्वती रस्ता, वेदशास्त्रोत्तेजक सभेशेजारी, पुणे ४११ ०३०.

मुद्रक : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., ०२०–२४४७४७६२

# नरदेहाचे महत्त्व : दुर्लभ संधी

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।
जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीते ।।

या नरदेहाचेनि आधारे । नाना साधनांचेनि द्वारे ।
मुख्य सारासार विचारे । बहुत सुटले ।।

या नरदेहाचेनि संमंधे । बहुत पावले उत्तम पदे ।
अहंता सांडून स्वानंदे । सुखी जाले ।।

पशुदेही नाही गती । ऐसे सर्वत्र बोलती ।
म्हणौन नरदेहीच प्राप्ती । परलोकाची ।।

नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधेन ।
परंतु हा परोपकारी झिजऊन । कीर्तिरूपे उरवावा ।।

देह परमार्थी लाविले । तरीच याचे सार्थक जाले ।
नाही तरी हे वेर्थचि गेले । नाना आघाते मृत्युपंथे ।।

नाना सुकृताचे फळ । तो हा नरदेह केवळ ।
त्याहिमधे भाग्य सफळ । तरीच सन्मार्ग लागे ।।

जन्मा आलियाचे फळ । कांही करावे सफळ ।
ऐसे न करितां निर्फळ । भूमिभार होये ।।

देहे परलोकींचे तारुं । नाना गुणांचा गुणागरू ।
नाना रत्नांचा विचारु । देह्याचेनी ।।

देह्याचेन गायेनकळा । देह्याचेन संगीतकळा ।
देह्याचेन अंतर्कळा । ठाई पडे ।।

जे जे देहे धरुनी आले । ते ते काही करून गेले ।
हरिभजने पावन जाले । कितीयेक ।।

असो कांही येक करणे । कैसे घडे देह्याविणे ।
देहे सार्थकी लावणे । म्हणिजे बरे ।।

# आत्मविश्वास हवा... धैर्य हवे... प्रयत्न हवेत...

धीर धरा धीर धरा तकवा । हडबडूं गडबडूं नका ।
काळ देखोनि वर्तावे । सांडावे भय पोटिंचे ।।

धरावा धीर तो मोठा । विचारे पाहतां बरे ।
अधीर माणसे खोटी । काम कांही कळेचिना ।।

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ।।

रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते ।
डोळे झांकणी करावी ते । काये निमित्य ।।

बहुतांचे बोली लागले । ते प्राणी अनुमानी बुडाले ।
मुख्य निश्चये चुकले । प्रत्ययाचा ।।

उदंडाचे उदंड ऐकावे । परी ते प्रत्यये पाहावे ।
खरे खोटे निवडावे । अंतर्यामी ।।

घालून अकलेचा पवाड । व्हावे ब्रह्मांडाहून जाड ।
तेथे कैचे आणिले द्वाड । करंटपण ।।

आधी कष्ट मग फळ । कष्टचि नाही ते निर्फळ ।
साक्षेपेविण केवळ । वृथापुष्ट ।।

जो दुसऱ्याचे अंतर जाणे । देश काळ प्रसंग जाणे ।
तया पुरुषा काय उणे । भूमंडळी ।।

अचुक येत्न करवेना । म्हणौन केले ते सजेना ।
आपला अवगुण जाणवेना । कांही केल्या ।।

यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेविण दरिद्रता ।
उमजला लोक तो धाला । उमजेना तो हपापला ।।

भाग्यासी काय उणे रे । यत्नावांचूनि राहिले ।
यत्न तो करावा कैसा । हेचि आधी कळेचिना ।।

मुख्य यत्न विचाराचा । त्यावरी बोलणे बरे ।
चालणे सत्य नेमाचे । नीतिन्याय चुको नये ।।

बुद्धीने सर्वही होते । बुद्धिदाता नारायणु ।
आधी तो आपुला कीजे । लक्ष्मी चरणी वसे ।।

केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा । अंतरी धरितां बरे ।।

अचूक यत्न तो देवो । चुकणे दैत्य जाणिजे ।
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ।।

# मम् जीवनाचा शिल्पकार मी...

हे आवघे आपणांपासी । येथे बोल नाही जनासी ।
सिकवावे आपल्या मनासी । क्षणक्षणा ।।

जे दुसऱ्यास सांगावे । तें तुंवा स्वयेचि करावे ।
ऐसे केलिया स्वभावे । समाधान सकळिका ।।

कैचा धर्म कैचे दान । कैचा जप कैचे ध्यान ।
विचारीना पापपुण्य । तो रजोगुण ।।

मी तरुण मी सुंदर । मी बलाढ्य मी चतुर ।
मी सकळामध्ये थोर । म्हणे तो रजोगुण ।।

दुसऱ्याचे सर्व जावे । माझेचि बरे असावे ।
ऐसे आठवे स्वभावे । तो रजोगुण ।।

टवाळी ढवाळी निंदा । सांगणे घडे वेवादा ।
हास्य विनोद करी सर्वदा । तो रजोगुण ।।

शेरीरी क्रोध भरतां । नोळखे माता पिता ।
बंधु बहिण कांता । ताडी तो तमोगुण ।।

वरी चांगला अंतरी गोड नाही ।
तया मानवाचे जिणे वेर्थ पाही ।
वरी चांगला अंतरी गोड आहे ।
तयालागी कोणीतरी शोधिताहे ।।

भला रे भला बोलती ते करावे ।
बहुता जनांचे मुखे येश घ्यावे ।
परी शेवटी सर्व सोडोनी द्यावे ।
मरावे परी कीर्तिरूपे उरावे ।।

## आदर्श दिनचर्या

प्रात:काळी उठावे । कांही पाठांतर करावे ।
येथानशक्ति आठवावे । सर्वोत्तमासी ।।

मागील उजळणी पुढे पाठ । नेम धरावा निकट ।
बाष्कळपणाची वटवट । करुंच नये ।।

कांही फळाहार घ्यावा । मग संसारधंदा करावा ।
सुशब्दे राजी राखावा । सकळ लोक ।।

ज्या ज्याचा जो व्यापार । तेथे असावे खबर्दार ।
दुश्चीतपणे तरी पोर । वेढा लावी ।।

चुके ठके विसरे सांडी । आठवण जालियां चर्फडी ।
दुश्चित आळसाची रोकडी । प्रचित पाहा ।।

ऐक सदेवपणाचे लक्षण । रिकामा जाऊं नेदी येक क्षण ।
प्रपंच वेवसायाचे ज्ञान । बरे पाहे ।।

# व्यायाम हवा

धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।
नाना बुद्धी शक्ताला । म्हणोनी सिकवाव्या ।।

शक्तीने पावती सुखे । शक्ति नसता विटंबना ।
शक्तीने नेटका प्राणी । वैभव भोगितां दिसे ।।

कोण पुसे अशक्ताला । रोगीसे बराडी दिसे ।
शक्ती तो सर्वहि सुखे । शक्ती आनंद भोगवी ।।

शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने यत्न होतसे ।
शक्ति युक्ति जये ठाई । तेथे श्रीमंत धावती ।।

असो हे बोलणे जाले । युक्तीवीण कामा नये ।
युक्तीला पाहिजे शक्ती । तस्मात् शक्ती प्रमाण हे ।।

# आळस : श्रीसमर्थांचा शत्रू

आळसाचे फळ रोकडे । जांभया देऊन निद्रा पडे ।
सुख म्हणौन आवडे । आळसी लोकां ।।

साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढे सुखाडती ।
खाती जेविती सुखी होती । येत्ने करुनी ।।

आळस उदास नागवणा । आळस प्रेत्नबुडवणा ।
आळसे करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ।।

म्हणौन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।
अरत्री परत्री जीवा । समाधान ।।

लहानथोर काम कांही । केल्यावेगळे होत नाही ।
करंट्या सावध पाही । सदेव होसी ।।

म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपे जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळे ।।

आलस्य अवघाच दवडावा । येत्न उदंडचि करावा ।
शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ।।

झिजल्यावांचुनी कीर्ति कैंची । मान्यता नव्हे की फुकाची ।
जिकडे तिकडे होते ची ची । अवलक्षणे ।।

कष्टेविण फळ नाही । कष्टेविण राज्य नाही ।
केल्याविण होत नाही । साध्य जनी ।।

आळसे काम नासते । हे तो प्रत्ययास येते ।
कष्टाकडे चुकाविते । हीन जन ।।

आधी कष्टांचे दु:ख सोसिती । ते पुढे सुखाचे फळ भोगिती ।
आधी आळसे सुखावती । त्यासी पुढे दु:ख ।।

जेही उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ।।

## बहिरंग नव्हे ; अंतरंग सुधारा

रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहजगुणास न चले उपाये ।
कांही तरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ।।

काळे माणुस गोरें होयेना । वनाळास येत्न चालेना ।
मुक्यास वाचा फुटेना । हा सहजगुण ।।

आंधळे डोळस होयेना । बधिर तें ऐकेना ।
पांगुळ पाये घेइना । हा सहजगुण ।।

अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती ।
कुविद्या सांडून सिकती । शाहाणे विद्या ।।

मूर्खपण सांडितां जाते । शाहाणपण सिकतां येते ।
कारबार करितां उमजतें । सकळ कांही ।।

मान्यता आवडे जीवी । तरी कां उपेक्षा करावी ।
चातुर्येविण उंच पदवी । कदापि नाही ।।

अंतर्कळा श्रृंघारावी । नानापरी उमजवावी ।
संपदा मेळऊन भोगावी । सावकास ।।

चातुर्ये श्रृंघारे अंतर । वस्त्रे श्रुंघारे शरीर ।
दोहिमधे कोण थोर । बरें पाहा ।।

बाह्याकार श्रृंघारिले । तेणे लोकांच्या हातासि काये आले ।
चातुर्ये बहुतांसी रक्षिले । नाना प्रकारें ।।

वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण ते भूषण ।
चाळणेविण येक क्षण । जाऊंच नेदी ।।

# अवगुण सोडीता जाती

सकळ अवगुणामधें अवगुण । आपले अवगुण वाटती गुण ।
मोठे पाप करंटपण । चुकेना की ।।

आपली आपण करी स्तुती । स्वदेशी भोगी विपत्ती ।
सांगे वडिलांची कीर्ती । तो येक मूर्ख ।।

अकारण हास्य करी । विवेक सांगतां न धरी ।
जो बहुतांचा वैरी । तो येक मूर्ख ।।

बहुत जागते जन । तयांमध्ये करी शयन ।
परस्थळी बहु भोजन । करी तो येक मूर्ख ।।

घरी विवेक उमजे । आणि सभेमध्यें लाजे ।
शब्द बोलतां निर्बुजे । तो येक मूर्ख ।।

आपणाहून जो श्रेष्ठ । तयासी अत्यंत निकट ।
सिकवणेचा मानी वीट । तो येक मूर्ख ।।

घरीच्यावरी खाय दाढा । बाहेरी दीन बापुडा ।
ऐसा जो कां वेड मूढा । तो येक मूर्ख ।।

स्वयें नेणे परोपकार । उपकाराचा अनोपकार ।
करी थोडे बोले फार । तो येक मूर्ख ।।

दंत चक्षु आणि घ्राण । पाणी वसन आणि चरण ।
सर्वकाळ जयाचे मळिण । तो येक मूर्ख ।।

जिवलगांस परम खेदी । सुखाचा शब्द तोहि नेदी ।
नीच जनांस वंदी । तो येक मूर्ख ।।

परपीडेचे मानी सुख । परसंतोषाचे मानी दु:ख ।
गेले वस्तूचा करी शोक । तो येक मूर्ख ।।

अल्प अन्याय क्षमा न करी । सर्वकाळ धारकी धरी ।
जो विस्वासघात करी । तो येक मूर्ख ।।

आपले काज होये तंवरी । बहुसाल नम्रता धरी ।
पुढिलांचे कार्य न करी । तो येक मूर्ख ।।

दोष ठेवी पुढिलांसी । तेचि स्वये आपणापासी ।
ऐसे कळेना जयासी । तो येक पढतमूर्ख ।।

मागे येक पुढे येक । ऐसा जयाचा दंडक ।
बोले येक करी येक । तो येक पढतमूर्ख ।।

रात्रंदिवस करी श्रवण । न सांडी आपले अवगुण ।
स्वहित आपले आपण । नेणे तो येक पढतमूर्ख ।।

# उत्तम गुण अभ्यासिता येती ...

वाट पुसिल्याविण जाऊं नये ।
फळ वोळखिल्याविण खाऊं नये ।
पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकी ।।

अति वाद करुं नये । पोटी कपट धरुं नये ।
शोधिल्याविण करुं नये । कुळहीन कांता ।।

विचारेविण बोलो नये । विवंचनेविण चालो नये ।
मर्यादेविण हालो नये । कांही येक ।।

वक्त्यास खोदू नये । ऐक्यतेसी फोडूं नये ।
विद्याअभ्यास सोडूं नये । कांही केल्या ।।

अति क्रोध करुं नये । जिवलगांस खेदूं नये ।
मनी वीट मानूं नये । सिकवणेचा ।।

क्षणाक्षणा रुसों नये । लटिका पुरुषार्थ बोलों नये ।
केल्याविण सांगों नये । आपला पराक्रमु ।।

बोलिला बोल विसरो नये । प्रसंगी सामर्थ्य चुको नये ।
केल्याविण निखंदूं नये । पुढिलांसी कदा ।।

आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कार्य कांही ।।

सुखा आंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडूं नये ।
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ।।

कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये ।
परपीडा करूं नये । विस्वासघात ।।

बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये ।
बहुत दिवस राहों नये । पिसुणाचेथे ।।

धूम्रपान घेऊं नये । उन्मत्त द्रव्य सेऊं नये ।
बहुचकासी करूं नये । मैत्री कदा ।।

तोंडी सीवी असों नये । दुसऱ्यास देखोन हांसों नये ।
उणे अंगी संचारो नये । कुळवंताचे ।।

देखिली वस्तु चोरूं नये । बहुत कृपण होऊं नये ।
जिवलगांसी करूं नये । कळह कदा ।।

अलाधनें माजो नये । हरिभक्तीस लाजो नये ।
मर्यादेविण चालो नये । पवित्र जनी ।।

सभा देखोन गळों नये । समई उत्तर टळो नये ।
धि:कारिता चळो नये । धारिष्ट आपुले ।।

सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथे जाऊ नये ।
कदा अभिमान घेऊ नये । असत्याचा ।।

अपकीर्ती ते सांडावी । सदकीर्ती वाढवावी ।
विवेके दृढ धरावी । वाट सत्याची ।।

पोटी चिंता धरुं नये । कष्टे खेद मानूं नये ।
समई धीर सांडू नये । कांही केल्या ।।

अपमानितां सिणों नये । निखंदितां कष्टो नये ।
धि:कारितां झुरो नये । कांही केल्या ।।

नित्यनेम सांडू नये । अभ्यास बुडो देऊं नये ।
परतंत्र होऊं नये । कांही केल्या ।।

परोपकार सांडू नये । परपीडा करुं नये ।
विकल्प पडों देऊं नये । कोणीयेकासी ।।

बहुसाल बोलों नये । अबोलणें कामा नये ।
बहुत अन्न खाऊं नये । उपवास खोटा ।।

बहुसाल निजों नये । बहुत निद्रा मोडूं नये ।
बहु नेम धरुं नये । बाश्कळ खोटे ।।

बहुजनीं असों नये । बहु आरण्य सेऊं नये ।
बहुदेह पाळूं नये । आत्महत्या खोटी ।।

उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ।
वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ।।

उत्तम गुणी श्रृंघारला । ज्ञानवैराग्ये शोभला ।
तोचि येक जाणावा भला । भूमंडळी ।।

जंवरी चंदन झिजेना । तंव तो सुगंध कळेना ।
चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ।।

जनीजनार्दन वोळला । तरी काये उणे तयाला ।
राजी राखावे सकळांला । कठीण आहे ।।

# खूप मित्र जोडा ...

आपण दुसऱ्यास करावे । ते उसिणें सवेंचि घ्यावे ।
जना कष्टवितां कष्टावे । लागेल बहु ।।

लोक आपणासि वोळावे । किंवा आवघेच कोसळावे ।
आपणास समाधान पावे । ऐसे करावे ।।

समाधानें समाधान वाढे । मित्रिनें मित्रि जोडे ।
मोडितां क्षणमात्रे मोडे । बरेपण ।।

तनें मनें झिजावे । तेणें भले म्हणोन घ्यावें ।
उगेंचि कल्पितां सिणावे । लागेल पुढे ।।

आपण येकायेकी येकला । सृष्टीत भांडत चालिला ।
बहुतांमध्ये येकल्याला । येश कैचे ।।

बहुतांचे मुखी उरावे । बहुतांचे अंतरी भरावे ।
उत्तम गुणी विवरावे । प्राणिमात्रासी ।।

उदंड धि:कारुन बोलती । तरी चळों नेदावी शांती ।
दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु ।।

स्वयें आपण कष्टावे । बहुतांचे सोसित जावे ।
झिजोन कीर्तीस उरवावे । नाना प्रकारे ।।

कीर्ती पाहों जाता सुख नाही । सुख पाहतां कीर्ती नाही ।
विचारेविण कोठेचि नाही । समाधान ।।

# शेजाऱ्यांना मदत करा ...

आपण येथेष्ट जेवणे । उरले ते अन्न वाटणे ।
परंतु वाया दवडणे । हा धर्म नव्हे ।।

तैसे ज्ञानें तृप्त व्हावे । तेंचि ज्ञान जनास सांगावे ।
तरतेन बुडों नेदावे । बुडतयासी ।।

शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावे ।
उणे पडो नेदावे । कोणियेकाचे ।।

आडलें जाकसले जाणावे । यथानशक्ति कामास यावे ।
मृदवचने बोलत जावे । कोणीयेकासी ।।

दुसऱ्याच्या दु:खे दुखवावे । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणिमात्रास मेळऊन घ्यावे । बऱ्या शब्दे ।।

बहुतांचे अन्याये क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ।
आपल्यापरीस व्हावे । पारखे जन ।।

दुसऱ्याचे अंतर जाणावे । तदनुसारचि वर्तावे ।
लोकांस परीक्षित जावें । नाना प्रकारे ।।

नेमकचि बोलावे । तत्काळचि प्रतिवचन द्यावें ।
कदापी रागास न यावे । क्षमारूपे ।।

उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ।
सावधपणे करीत जावा । संसार आपला ।।

आपल्या पुरुषार्थ वैभवे । बहुतांस सुखी करावे ।
परंतु कष्टी करावे । हे राक्षसी क्रिया ।।

शाहाणे करावे जन । पतित करावे पावन ।
सृष्टिमधे भगवद्भजन । वाढवावें ।।

जितुके कांही आपणासी ठावें । तितुके हळुहळु सिकवावे ।
शाहाणे करुनि सोडावे । बहुत जन ।।

अपार असावे पाठांतर । सन्निधचि असावा विचार ।
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ।।

मुलाचे चालीनें चालावे । मुलाच्या मनोगतें बोलावे ।
तैसे जनास सिकवावे । हळुहळु ।।

जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा ।
राहराहों शोध घ्यावा । परांतरांचा ।।

# कुणाचे अंत:करण दुखवू नका ...

दुसऱ्याचे चालणीं चालावे । दुसऱ्याचे बोलणी बोलावे ।
दुसऱ्याचे मनोगतें जावे । मिळोनियां ।।

आधी अंतर हाती घ्यावे । मग हळुहळु उकलावे ।
नाना उपाये न्यावे । परलोकासी ।।

प्रसंग जाणोनि बोलावे । जाणपण कांहीच न घ्यावे ।
लीनता धरून जावें । जेथतेथे ।।

परांतरास न लावावा ढका । कदापि पडो नेदावा चुका ।
क्षमासीळ तयाच्या तुका । हानी नाही ।।

बरे बोलतां सुख वाटते । हें तों प्रत्यक्ष कळते ।
आत्मवत परावें ते । मानीत जावे ।।

जे दुसऱ्यास दु:ख करी । ते अपवित्र वैखरी ।
आपणास घात करी । कोणीयेके प्रसंगी ।।

कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनी भंगिले ।
क्षणाक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ।।

पेरिलें ते उगवते । बोलण्यासारिखे उत्तर येते ।
तरी मग कर्कश बोलावे ते । काये निमित्य ।।

जगामध्ये जगमित्र । जिव्हेपासी आहे सूत्र ।
कोठे तऱ्ही सत्पात्र । शोधून काढावे ।।

## बोलणे सुंदर.. वाचणे सुंदर.. लिहिणे सुंदर..

बालके बाळबोध अक्षर । घडसुनी करावे सुंदर ।
जे देखतांचि चतुर । समाधान पावती ।।

वाटोळे सरळे मोकळे । वोतले मसीचे काळे ।
कुळकुळीत वळी चालिल्या ढाळे । मुक्तमाळा जैशा ।।

अक्षरमात्र तितुके नीट । नेमस्त पैस काने नीट ।
आडव्या मात्रा त्याहि नीट । आर्कुली वेलांड्या ।।

पहिले अक्षर जे काढिले । ग्रंथ संपेतो पाहात गेले ।
येका टाकेचि लिहिले । ऐसे वाटे ।।

वोळीस वोळी लागेना । आर्कुली मात्रा भेदीना ।
खालिले वोळीस स्पर्शेना । अथवा लंबाक्षर ।।

पान शिषाने रेखाटावे । त्यावरी नेमकचि ल्याहावे ।
दुरी जवळी न व्हावे । अंतर वोळीचे ।।

कोठे शोधासी आडेना । चुकी पाहतां सांपडेना ।
गरज केली हे घडेना । लेखकापासुनी ।।

ज्याचे वय आहे नूतन । त्याने ल्याहावे जपोन ।
जनासी पडे मोहन । ऐसे करावे ।।

भोवती स्थळ सोडून द्यावे । मधेचि चमचमित ल्याहावे ।
कागद झडतांही झडावे । नलगेचि अक्षर ।।

ऐसा ग्रंथ जपोनी ल्याहावा । प्राणिमात्रास उपजे हेवा ।
ऐसा पुरुष तो पहावा । म्हणती लोक ।।

सुंदर अक्षर ल्याहावे । पष्ट नेमस्त वाचावें ।
विवर विवरो जाणावे । अर्थांतर ।।

अभ्यासे प्रगट व्हावे । नाही तरी झांकोन असावे ।
प्रगट होऊन नासावे । हे बरे नव्हे ।।

अक्षरे गाळून वाची । कां तें घाली पदरिंची ।
नीगा न करी पुस्तकाची । तो येक मूर्ख ।।

आपण वाचीना कधी । कोणास वाचावया नेदी ।
बांधोन ठेवी बंदी । तो येक मूर्ख ।।

समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ।
गुण सांगतां अवगुण । पाहे तो येक पढतमूर्ख।।

आधीच सिकोन जो सिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ।
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळे ।।

अक्षर सुंदर वाचणे सुंदर । बोलणे सुंदर चालणे सुंदर ।
भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ।।

अखंड येकांत सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा ।
प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनी ।।

विद्या उदंडचि सिकला । प्रसंगमान चुकतचि गेला ।
तरी मग तये विद्येला । कोण पुसे ।।

# भगवंताकडे काय मागावे ? ...

कोमळ वाचा दे रे राम । विमळ करणी दे रे राम ।।धृ ।।
प्रसंग ओळखी दे रे राम । धूर्तकळा मज दे रे राम ।।
हितकारक दे रे राम । जनसुखकारक दे रे राम ।।
अंतरपारखी दे रे राम । बहुजनमैत्री दे रे राम ।।
विद्यावैभव दे रे राम । उदासीनता दे रे राम ।।
मागो नेणे दे रे राम । मज न कळे ते दे रे राम ।।
तुझी आवडी दे रे राम । दास म्हणे मज दे रे राम ।।

संगीत गायन दे रे राम । आलाप गोडी दे रे राम ।।
धातमाता दे रे राम । अनेक धाटी दे रे राम ।।
रसाळ मुद्रा दे रे राम । जाड कथा मज दे रे राम ।।
दस्तक टाळी दे रे राम । नृत्यकला मज दे रे राम ।।
प्रबंध सरळी दे रे राम । शब्द मनोहर दे रे राम ।।
सावधपण मज दे रे राम । बहुत पाठांतर दे रे राम ।।
दास म्हणे रे सद्‌गुण धाम । उत्तम गुण मज दे रे राम ।।

पावनभिक्षा दे रे राम । दीनदयाळा दे रे राम ।।
अभेदभक्ती दे रे राम । आत्मनिवेदन दे रे राम ।।
तद्रुपता मज दे रे राम । अर्थारोहण दे रे राम ।।
सज्जनसंगती दे रे राम । अलिप्तपण मज दे रे राम ।।
ब्रह्म अनुभव दे रे राम । अनन्यसेवा दे रे राम ।।
मजविण तू मज दे रे राम । दास म्हणे मज दे रे राम ।।

# ।। श्री समर्थांचा मुलांना उपदेश ।।

बरें सत्य बोला यथातथ्य चाला ।
बहू मानिती लोक येणें तुम्हांला ।।

धरा बुद्धि पोटीं विवेकें मुलें हो ।
बरा गुण तो अंतरामाजि राहो ।।

दिसामाजि कांहीं तरी तें लिहावे ।
प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें ।।

गुणश्रेष्ठ ऊपास्य त्यांचें करावें ।
बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ।।

बहू खेळ खोटा सदालस्य खोटा ।
समस्तांसि भांडेल तोची करंटा ।।

बहुतां जनांलागिं जीवी भजावें ।
भल्यासंगती न्याय तेथें भजावें ।।

भला रे भला बोलती तें करावें ।
बहुतां जनांचे मुखें येश घ्यावें ।।

परी शेवटीं सर्व सोडोनी द्यावें ।
मरावें परी कीर्तिरूपें उरावें ।।

# श्री समर्थ रामदास स्वामींचा अखेरचा संदेश

*माझी काया आणि वाणी ।*
*गेली म्हणाल अंत:करणी ।।*
*परी मी आहे जगज्जीवनी ।*
*निरंतर ।।१ ।।*

*आत्माराम दासबोध ।*
*माझे स्वरूप स्वत:सिद्ध ।*
*असता ना करावा खेद ।*
*भक्तजनी ।।२ ।।*

।। श्रीराम समर्थ ।।

नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नाना विकारी ।।
नको रे मना सर्वदा अंगिकारू ।
नको रे मना मत्सरू दंभ भारू ।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

॥ श्रीराम समर्थ ॥

केल्याने होत आहे रे
आधी केलेचि पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा
अंतरी धरिता बरे ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

मूल्य : आचरण